# पुणे विद्यापीठ

## दरपत्रक सूचना

जा.क्र./स्थावर/दरपत्रक/२०१४–१५/१७०                                         दि. २६/०७/२०१४

पुणे विद्यापीठ परिसरातील खालील कामांकरीता सार्वजनिक बांधकाम, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम अथवा इतर शासकीय/निमशासकीय संस्थेतील योग्य श्रेणीतील नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांकडून बी –१ नमुन्यात मोहारबंद (दोन लिफाफा पद्धतीने) दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे रक्कम रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | अनामत रक्कम (EMD) | को–या दर पत्रकाची किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे विद्यापीठाच्या आवारातील अभ्यागत निवास येथील खोली क्र. १८ ते २० चे विद्युत कामे करणे. | ४,७६,१७२/– | ४५ दिवस | ५०००/– | ५००/– |

## <u>अटी व शर्ती</u>

१. कोऱ्या दरपत्रक संचाची किंमत (विना परतावा) डिमांड ड्रॉप्टने मा. कुलसचिव पुणे विद्यापीठ, पुणे–७ यांचे नावाने भरावा लागेल.

२. कोऱ्या दरपत्रकाकरीता योग्य श्रेणीतील विद्युत नोंदणीकृत व विद्युत परवानाधारक ठेकेदारांनीच अर्ज करावेत. कोरी दरपत्रके कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांच्या कार्यालयात दि. ३१/०७/२०१४ पासून ते दि. ०८/०८/२०१४ पर्यंत कार्यालयीन वेळेत मिळतील.

३. मोहरबंद दरपत्रके स्वीकारण्याची अंतिम तारीख ११/०८/२०१४ असून मोहोरबंद दरपत्रके कार्यालयीन वेळेत कार्यकारी अभियंता (प्रकल्प), स्थावर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे – ७. यांच्या कार्यालयात दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील.

४. लिफाफा क्र.१ मध्ये ठेकेदाराचे पत्र, अनामत रक्कमेचा धनाकर्ष, विद्युत परवाना प्रमाणपत्र व नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत व दरपत्रकात नमुद केल्याप्रमाणे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. लिफाफा क्र. २ मध्ये पुरविण्यात आलेले दरपत्रक ठेकेदाराने स्वत:च्या हस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे तसेच स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. अन्यथा दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५. प्राप्त झालेली मोहोरबंद दरपत्रके (लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २) दि. १२/०८/२०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास)

६. लिफाफ्यावर कामाचे नाव, दरपत्रक क्रमांक तसेच ठेकेदाराचे नाव असणे आवश्यक आहे.

७. अटी व शर्ती असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाही.

८. दरपत्रकातील अटी व शर्ती तसेच इतर माहिती कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

९. सविस्तर दरपत्रक सुचना पुणे विद्यापीठाच्या संकेत स्थळ www.unipune.ac.in वर सुद्धा उपलब्ध आहे.

कार्यकारी अभियंता (प्रकल्प)
पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

प्रत माहितीसाठी :

१ स्थावर विभाग– नोटीसबोर्ड
२ प्रशासन विभाग– नोटीसबोर्ड
३ विभाग प्रमुख, सी.आय.एन.एस.–इंटरनेट प्रसिध्दीसाठी